# विभाग II



*** कृतिपत्रिकेमध्ये या उताऱ्यांवर शिक्षकांनी प्रश्न विचारणे अपेक्षित आहे.**

१. समाजशास्त्र एक शास्त्र म्हणून आपण ज्या समाजात रहातो त्या समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करायला शिकवते. अर्थातच ही प्रेरणा आपण नैसर्गिक शास्त्रांकडून घेतली आहे. समाजाचा पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी ऑगस्ट कॉम्तनी वैज्ञानिक अभ्यासपद्धती वापरली. ऑगस्ट कॉम्त हे मूळचे फ्रान्सचे. अर्थातच त्या वेळच्या अडथळ्यांच्या आणि संघर्षाच्या परिस्थितीचा परिणाम ऑगस्ट कॉम्तच्या विचारांवर झाला होता. फ्रेंच राज्यक्रांती तर आपण ऐकून आहोत. तसेच औद्योगिक क्रांतीचाही त्या समाजावर परिणाम झालेला होता. एकूणच फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती यांचा परिपाक म्हणून फ्रान्समधील जनजीवन बदलून गेले होते.

समाजशास्त्र एक शास्त्र म्हणून विशेषतः युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात विकसित झाले. समाजशास्त्राच्या या विकास प्रक्रियेतूनच ऑगस्ट कॉम्त, हर्बट स्पेन्सर, एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर यांसारखे अभिजात विचारवंत/समाजशास्त्रज्ञ उदयास आले. समाजशास्त्राचा विकास उत्तर अमेरिकेत देखील झाला. यामध्ये विशेषतः सी.एच्.कुले, टॉलकॉट पार्सन्स आणि मर्टन ह्यांचा उल्लेख करावा लागेल. समाजशास्त्राचा विकास भारतामध्ये देखील झाला. यात विशेषतः जी.एस.घुर्ये, एम्.एन्.श्रीनिवास, टी.के. ओमेन, गेल् ऑम्वेट आणि मुखर्जी ह्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रभावातून भारतात समाजशास्त्र ही एक शैक्षणिक विद्याशाखा म्हणून पाहिली गेली. भारतामध्ये समाजशास्त्राचा अभ्यास करताना भारतीय संस्कृती, राहणीमान, भाषा, आचारविचार ह्यांचा विचार करून जात, आदिवासी समुदाय, सामाजिक परिवर्तन, सामाजिक समस्या, शिक्षण, सामाजिक चळवळी, ग्रामीण समाजशास्त्र, उपयोजित समाजशास्त्र ह्यांसारख्या मुद्द्यांचा विचार केला गेला.

अशाप्रकारे समाजशास्त्राचा अभ्यास किंवा समाजशास्त्र ही शाखा समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी समर्पक आणि उपयोगी असून त्याची व्याप्ती खूप विशाल आणि गतिशील आहे.

२. १९ व्या शतकात फ्रान्समध्ये ऑगस्त कॉम्त यांनी समाजशास्त्राचा पाया रचला. सामाजिक वास्तव परिस्थिती वैज्ञानिक पद्धतींतून अभ्यासता येते या गृहितकावर त्यांचा प्रत्यक्षवादी दृष्टीकोन आधारित होता. समाजशास्त्र या स्वतंत्र विद्याशाखेमध्ये अनेक पाश्चिमात्त्य आणि भारतीय विचारवंतांनी योगदान दिले आहे.

हा परिच्छेद केवळ एका दृष्टीकोनावर लक्ष केंद्रित करतो – संरचनात्मक कार्यवाही दृष्टीकोन. यालाच संरचनात्मक कार्यवाद असेही म्हणतात.

हा दृष्टीकोन स्पेन्सर यांच्या जैविक सिद्धांतावर आधारित आहे. त्यात समाजाची जैविक संस्थेशी तुलना केली गेली आहे. ज्याप्रमाणे विविध अवयवांचे मिळून संपूर्ण शरीर तयार होते तसेच समाज सुद्धा लग्न, कुटुंब, अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, शिक्षण आणि धर्म या व्यवस्थांचा बनलेला आहे.

या प्रत्येक व्यवस्था स्वतंत्र असतात तसेच त्या एकमेकावर अवलंबून देखील असतात. यालाच उपव्यवस्था असेही म्हटले जाते. प्रत्येक उपव्यवस्था स्वतःचे कार्य करते. परंतु कधीकधी यात समस्या देखील उद्भवतात. त्यामुळे व्यवस्था अकार्यक्षम देखील होऊ शकते. व्यवस्थेचे भाग व उपभाग परस्पर संबंधित आहेत. समाजाचे काम समजून घेण्याचा हा एक पर्याय आहे.

३. शहरांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या प्रमाणात लोक जेथे राहतात. मुंबईसारख्या शहरात १७ दशलक्ष लोक राहातात. ह्यासारख्या शहरांना 'महानगरे' म्हणतात. भारतात अशी बरीच महानगरे आहेत. यामध्ये मुंबई, चेन्नई, कोलकाता, पुणे, बेंगळुर, हैदराबाद, अहमदाबाद, सूरत, कानपूर, विशाखापट्टणम्, पाटणा, विजयवाडा, जमशेदपूर ह्यांचा उल्लेख करता येईल. परंतु अशा प्रकारच्या महानगरांमध्ये दिल्या गेलेल्या पायाभूत सुविधा आणि सेवा आणि लोकसंख्या, वाढत्या मागण्या ह्यांचा मेळ कधीच बसत नाही. परिणामस्वरूप शहरांमध्ये बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते; यामध्ये घरांची समस्या, रस्ते, दळणवळणाची सुविधा, मनोरंजनाची साधने, क्रीडांगणे, आरोग्य सुविधा, मोकळ्या जागा आणि हरित क्षेत्रांचे प्रश्न समोर उभे राहतात.

आज शासनाकडून ह्या समस्यांवर मात करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न चालू आहेत. जे विशेषतः अधिक पायाभूत सुविधा आणि सेवा पुरवण्यासाठी केले जात आहेत. परंतु काही वेळा राजकीय इच्छाशक्ती कमी पडते. काही वेळा राजकीय दूरदृष्टी कमी पडते, तर काही वेळा वैयक्तिक स्वार्थासाठी केलेल्या लाचलुचपतीमुळे सामान्य जनतेला आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा ह्यामध्ये अडथळे निर्माण होतात.

खरे पाहता, 'शहरे' ही नवनवीन संधीची जागा असते. ह्यामुळेच लोक शहरांकडे आकर्षिले जातात. शहरातील ही संधी लोकांना अभ्यास, काम आणि शहरी जीवनमान या रूपात मिळते. लोकांचे ह्या कारणांसाठी शहरी भागाकडे आकर्षित होणे ह्या क्रियेलाच 'स्थलांतर' असे म्हणतात. महानगरे ह्याच कारणांमुळे लोकांच्या आकर्षणाची केंद्रे बनली आहेत.

४. तुम्हाला कधी आश्चर्य वाटते का ? की आपण कसे जगतो? कोणत्याही सामाजिक नातेसंबंधांमध्ये आपण काय विचार करतो आणि एकमेकांशी कसे वागतो? या आपल्या नातेसंबंधावर गुंतागुंतीच्या घटकांचा प्रभाव असतो का?.

**पुढील छोटी कथा वाचा.**

श्री व सौ शहा यांचे १९९४ साली आधी कोर्टात लग्न झाले. नंतर धार्मिक विधी देखील करण्यात आले. त्यांना २००३ साली दोन जुळी मुले झाली आणि चार वर्षे घरी राहिल्यानंतर ते शाळेत गेले. त्यानंतर त्यांनी खाजगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश घेतला. परिणामतः त्याभागातील राज्य शिक्षण मंडाळाच्या शाळांपेक्षा त्यांच्या शाळेचे शुल्क अधिक होते.

दोघे पालक व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांच्याकडे मुलांना महागडे शालेय शिक्षण देण्यासाठी आर्थिक साधने उपलब्ध होती. त्यांच्या वर्गातील मुले मध्यम व उच्च वर्गातील होती. शाळेत मात्र कमी आर्थिक उत्पन्न वर्गातील मुलांसाठी सामाजिक कामाची संधी दिली जात असे. उच्च वर्गातील असूनदेखील शहा यांची जुळे मुले बिगरशासकीय संस्थेमध्ये जाऊन सामाजिक काम करण्याचा हा साप्ताहिक अनुभव उपभोगत असत.

हे दोन्ही तरूण आज सामाजिक कामात सहभागी आहेत. त्यातील एक स्थानिक राजकीय पक्षात युवा आघाडीत काम करतो तर दुसऱ्याने गरजू लोकांपर्यंत पोहोचून त्यांना मदतीचा हात देणाऱ्या आंतरराष्ट्रीय उपक्रमात सहभाग घेतला आहे.

त्या जुळ्या मुलांमध्ये निर्माण झालेल्या संवेदनशीलतेकडे पाहून त्यांचा पालकांना अतिशय आनंद झाला आहे. कुटुंब आणि शाळा या मुलांना संवेदनशील बनविण्यास कारणीभूत आहेत, असे आपणास वाटते काय?

५. संस्कृती या संज्ञेचा सामान्यतः वापर लोकांच्या अभिरुचीच्या संदर्भात केला जातो. उदा., शास्त्रीय संगीत, साहित्य, कलेची अभिरुची. पण समाजशास्त्रात संस्कृती या संकल्पनेत मानवाने निर्माण केलेल्या सर्वच गोष्टींचा समावेश होतो. विचार, मूल्य, धारणा, भाषा, ज्ञान आणि मानवाने समाजाचा घटक म्हणून निर्माण केलेल्या सर्व भौतिक घटकांचा समावेश संस्कृतीत होतो. भारतीयांच्या बाबतीत बोलायचं तर आपण नेहमी बोलताना किंवा वैचारिक व्यासपीठांवरही 'भारतीय संस्कृती' असा उल्लेख करत असतो. पण 'भारतीय संस्कृती' म्हणजे नेमकी काय आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. 'भारतीय' अशी एक सर्वसमावेशक, सर्वसामान्य सांस्कृतिक ओळख आहे का? ह्याचे उत्तर तपासून बघताना दुसरीकडे चायनीज, इंडोनेशियन संस्कृतींपेक्षा आपली वेगळी ओळख ठसवणारी आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे. ती कोणत्या घटकांमुळे हेदेखील लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आपला इतिहास, आपली भौगोलिक सीमा, इथले शासक, इथे झालेली आक्रमणं आणि त्यातून निर्माण झालेल्या एकात्मीकरण व संकरीकरणातूनच आपली 'भारतीय' संस्कृती विकसित झाली आहे. भारतीय समाज बहुविध संस्कृतींनी नटलेला आहे आणि बहुसांस्कृतिकता हे आपले बलस्थान आहे.

समाजशास्त्रात उपसंस्कृती अशी एक संकल्पना वापरली जाते. भारतीय संस्कृती म्हणजे अशा अनेक उपसंस्कृतींनी बनलेली आहे. काही वेळा प्रस्थापित संस्कृतीला आव्हान देणारी विरोधी संस्कृती निर्माण होते हेदेखील लक्षात घेतले पाहिजे.

आज प्रसार माध्यमांच्या प्रगतीमुळे जगभरातील संस्कृतींशी आपली ओळख होत आहे. दूरदर्शन आणि इंटरनेटमुळे जग जवळ येत आहे आणि एका अर्थाने छोटे होत चाललेय. आज वैश्विक संस्कृती, अशी नवीन संज्ञा आपण वापरतो. त्यामुळे खऱ्या अर्थाने कुठलीही संस्कृती शुद्ध किंवा सरमिसळ नसलेली राहिली आहे का हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

६. आजकालच्या जगात टेलिव्हिजन, इंटरनेट, मोबाइल ह्यांचे अनेक महत्त्व वाढले आहे की, त्याशिवाय जग ही कल्पनाच आपण करू शकत नाही. आपल्या जगण्याला खऱ्या अर्थाने माहितीच्या युगात परिवर्तित करण्यात ह्या सर्व साधनांचा पुरेपूर वाटा आहे. काही वेळा आपण ह्याला ज्ञानाचा किंवा माहितीचा विस्फोट असेही म्हणू शकतो. सध्या आपल्याकडे इतकी माहिती उपलब्ध आहे जी एका क्षणात आपणास इंटरनेटकडून मिळू शकते. पण ही मिळणारी माहिती अचूक, योग्य आणि किती वैध आहे याविषयी साशंकता उरते. अशा प्रकारच्या परिस्थितीमध्ये ज्या तांत्रिक साधनाद्वारे ही माहिती घेण्यात आली आहे ती माहिती इतर अनेक छपाई माध्यमांद्वारे तपासून त्यांची शहानिशा करून घेतली पाहिजे.
आजकाल अंकेक्षणामुळे (Digitalization) कोणत्याही क्षणी कोणतीही माहिती सामान्य लोक इंटरनेटच्या माध्यमातून संक्रमित करू शकतात. स्वतःच्या नावाने एखाद्या विषयावरील माहिती संकलित करून ती संक्रमित करणे हा लोकांचा उद्योगच झाला आहे. माहितीचे व्यवस्थापन करणे ही सुद्धा आजकाल एक कामाची संधी म्हणून पाहिली जात आहे, विशेषतः ज्या लोकांकडे एखादा कार्यक्रम किंवा योजना विकसित करण्याचे कौशल्य आहे. खरोखरच माहिती तंत्रज्ञानाने आजकाल सर्वांचे जीवन व्यापून टाकले आहे. आपण 5G वगैरे आजकाल नुसतेच ऐकून आहोत. पण पुढील जग यापेक्षाही प्रगतशील तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे हे निश्चित!

७. खरंच मुलांना अग्निशामक यंत्रे आणि मुलींना कपबश्यांचा सेट आवडतात? वयाच्या कितव्या वर्षापासून मूल एखाद्या रंग अथवा खेळाशी सांगड घालू शकते? ब्लॉगवरील पुढील कथा वाचा.

माझी मैत्रीण (अंबिका) आणि तिचे दोन महिन्यांचे बाळ (टिना) व मी एकदा दुकानात गेलो होतो.

मी खेळणी ठेवलेल्या विभागाकडे गेले आणि तिथे मला अतिशय छानसा पाणघोडा (सॉफ्ट टॉय) दिसला आणि मी ते खेळणे टिनाला द्यायचा विचार केला. मी ते खेळणे टिनाला दाखवले आणि तिला त्याच्यासोबत खेळणे आवडले असे मला दिसले.

आणि मी अगदी सहज अंबिकाला सांगितले की मी हे खेळणे टिनासाठी घेणार आहे. त्यावर अंबिका म्हणाली, "पण ते निळ्या रंगाचे आहे! तू गुलाबी रंगातील एखादे खेळणे का घेत नाहीस?" हे ऐकून मला एकदम हसूच फुटले व मी म्हणाले, "पण टिनाकडे निळ्या रंगाचे खेळणे का असू शकत नाही? तुला वाटतं तिला या वयात रंग प्राधान्य/ पसंती आहे?" "तिची आई म्हणून मला माहीत आहे" अंबिका उत्तरली.

तरीदेखील मी तो निळा पाणघोडा टिनासाठी खरेदी केला. मला हे माझ्या मैत्रिणीला सांगायचं होतं की कदाचित ती तिच्या मुलीच्या वतीने सर्व ठरवतेय आणि तिला 'Girly girl" या ठरावीक साच्यात बसवू पाहतेय. परंतु हे बोलण्यापासून मी स्वतःला परावृत्त केलं कारण पालक त्यांच्या पालकत्वाबाबत केल्या गेलेल्या टिकेच्या संदर्भात संवेदनशील असू शकतात.

काही वर्षांनंतर मी टिनाला भेटले आणि ती 'Girly girl" या साच्यात बसलेली मुलगी होती. अंबिका बरोबर होती, तिला व्यवस्थित माहीत होतं की तिच्या मुलीकडून काय अपेक्षित आहे, अगदी इतक्या लहान वयात देखील!

**८. पुढे काही घटना दिल्या आहेत ज्यांचा तुम्ही कदाचित अनुभव घेतला असेल.**

**घटना अ –**

रात्री जेवणात तुमच्या पालकांनी वांग्याची भाजी बनवली आहे. संपूर्ण कुटुंब एकत्र बसून जेवतंय आणि तुम्ही म्हणता, "मला भाजी नकोय." आणि तुमचे पालक म्हणतात की पण अजून तू त्या भाजीची चव देखील घेतली नाहीस." यावर तुम्ही उत्तर देता की "पण मला नाही आवडत. जेव्हा तुम्ही मसाला भरून तळून करता तेव्हाच मला आवडते."

**घटना ब –**

गुंजन नेहमी परीक्षेच्या एक आठवडा आधी अभ्यासाला सुरुवात करते. तथापि, सहामाहीत काय काय घडतंय यावर ती कायमच नीट लक्ष ठेवून असते. तिच्या शिक्षकांचे असे मत आहे की ती खूप काही करु शकते जर तिने परीक्षेची तयारी शेवटच्या क्षणाच्या ऐवजी थोडी आधीपासून केली तर! परंतु, गुंजन तिची सवय मोडायला असफल ठरतेय.

**घटना क –**

तुम्ही कायमच पारंपरिक वेशभूषा वापरली आहे. तुम्ही महाविद्यालयात आल्यावर तुम्हांला जाणवतं की काही विद्यार्थी पाश्चिमात्य कपडे घालतात. तुम्हांला सुद्धा तसे कपडे घालावेसे वाटतात पण तुम्हांला खात्री नाहीये की तुमचे पालक तुम्हांला परवानगी देतील.

आपण बदलांसाठी पुरेसे प्रवृत्त केले जातो का? आपल्याला बदलण्याची परवानगी आहे? बदलापासून रोखणारी शक्ती आहे? अनुरूप पर्याय उपलब्ध आहेत?